।। शिलम् परम् भूषणम् ।।

Hindmata Shikshan Mandal, Borgaon

# Mohanrao Patangrao Patil Mahavidyalaya, Borgaon


• Tal. Walwa, Dist. Sangli. (Pin-415 413). Ph. : (02342) 264524 •

Web : www.mppmborgaon.org •E-mail : mppmborgaon@gmail.com, bor297.cl@unishivaji.ac.in


Accredited by NAAC

# PROSPECTUS

• 2022 - 2023 •





## Vision

To empower culturally and socially underprivileged people.

## Mission

- To provide qualitative education.
- To cultivate honesty, punctuality and devotion among students to create a responsible and respected citizen.
- To develop versatile personality through curricular and co-curricular activities.
- To enable students to face the challenges in the changing universal scenario.
- To inculcate feeling of co-existence among students.
- To create awareness about social responsibility and secularism among the students.

## Objectives

- To cultivate moral and spiritual values among students and society.
- To create awareness among students about socio-economic need of the country.
- To enrich creativity and love of learning.
- To create right attitudes, interests and essential skills among students.
- To work for national and international integration.


* कार्यालयाचा पत्ता *

**मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,**

ता. वाळवा, जि. सांगली.

Web : www.mppmborgaon.org

E-mail : mppmborgaon@gmail.com, bor297.cl@unishivaji.ac.in


* महाविद्यालय अध्यापनाची वेळ *
सोमवार ते शनिवार स. ८ ते दु. १

* कार्यालय व ग्रंथालय कामकाजाची वेळ *
* सोमवार ते शनिवार स. ८ ते ३

**प्रस्तावना :**

बोरगांव आणि परिसरातील मुलींना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देऊन त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने 'शिलम् परम् भूषणम' या ब्रिद वाक्याने प्रेरित होऊन कै. मोहनराव पाटील (आण्णा) यांनी हिंदमाता शिक्षण मंडळ, बोरगांवची स्थापना १९६४ साली केली. हिंदमाता संकुलामध्ये बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, इंटरनॅशनल स्कूल व महाविद्यालय इ. शैक्षणिक शाखा कार्यरत आहेत. या शैक्षणिक संकुलात एकूण १५०० विद्यार्थी-विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. मा. माणिकराव पाटील (आबा) यांनी ग्रामीण भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने बोरगांव येथे मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालयाची स्थापना २००१ साली केली. हिंदमाता शिक्षण मंडळ विविध शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे. हेच ध्येय घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा अविरत प्रयत्न महाविद्यालय मा. अभिजित पाटील (दादा) यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहे.

## Introduction

Getting inspired by sanskrit subhashit 'Shilam Param Bhushanam', our respected, Late Mohanrao Patil (Anna) has established 'Hindmata Shikshan Mandal' in 1965 to educate girls in rural area. Hon. Mohanrao Patil (Anna) a visionary from rural area in Krishna Basin pointed out the importance of education. The institution has a vision of qualitative education for overall development of student. It runs Pre Primary, Primary, Secondary and Higher Secondary School, International school and a Senior College. To provide opportunity of higher education to rural students, the college has been established in 2001 under the visionary guidance of Hon'ble Manikrao Patil (Aba) and their fellow associates. This movement of education in rural area started by 'Anna' is now progressing and performing under the dynamic leadership of Hon'ble Abhijit Patil (Dada) and the management. Hindmata Shikshan Mandal makes continuous efforts to achieve the all-round development of students through various educational and socio-cultural activities. With this aim, the college strives hard to achieve overall development of the student.

**पदवी :**

१) शिवाजी विद्यापीठाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार तसेच निर्देशानुसार महाविद्यालयात उपलब्ध विषय संख्येनुसार बी. ए. प्रथम वर्षात प्रवेश दिला जाईल.

२) सदर विद्यार्थी बी. ए. च्या तीन वर्षांच्या प्रवेशासाठी पात्र राहील. प्रवेशाकरिता विद्यार्थ्याने उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (एच. एस. सी.) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) जे विद्यार्थी एच. एस. सी. किंवा त्या समकक्ष परीक्षा महाराष्ट्राबाहेरील राज्यातून उत्तीर्ण होतील अशा विद्यार्थ्यांना बी. ए. भाग १ मध्ये सशर्त प्रवेश दिला जाईल. अशा विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र घेतलेनंतरच त्यांचा प्रवेश निश्चित होईल. अशा विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण गुणपत्रिकेची मूळ प्रत तसेच त्यांच्या दोन साक्षांकित प्रति आणि स्थलांतर प्रमाणपत्र दोन महिन्याच्या आत सादर करणे गरजेचे आहे. अन्यथा त्यांचा प्रवेश रद्द केला जाईल.

1. Admission to B.A. I will be given according to the instructions and directions given by the Shivaji University & according to availability of subjects and seats in the college.
2. Admission of the concerned student for B.A. course will be eligible for three years. It is necessary to qualify HSC or equivalent exam to get admission for B.A.I.
3. Students who qualified HSC or equivalent exam out of Maharashtra, will get conditional admission for B. A. I. Admissions of such students will be confirmed unless or until he/she get eligibility of Shivaji University and the students should submit original passing marksheet of HSC with attested copies along with Transfer Certificate within two months.

## विद्याशाखा – कला

हा अभ्यासक्रम एकूण ३ वर्षांचा (६ सेमिस्टरचा) असून प्रत्येक सेमिस्टरसाठी (बी. ए. भाग १, २, ३) ६ पेपर्स असे एकूण ३६ पेपर्स अभ्यासक्रमासाठी आहेत.

**Faculty - Arts:**

The duration of the course is three years (6 semesters). For each semester there are 6 papers. There are 36 papers for B.A. course.

## बी. ए. भाग १

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून यु.जी.सी. व विद्यापीठाच्या सुचनेनुसार 'चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टीम' (CBCS) बी. ए. भाग १ साठी लागू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी खालील विषयातून एकूण ६ विषय निवडावेत.

From the academic year 2018-19, the university has introduced 'Choice Based Credit Sestem' (CBCS) for B.A.I. Students should select 6 subjects from the followings:

| | | | |
|---|---|---|---|
| Ability Enhancement Core Course (AECC) | | : | English Compulsory / इंग्रजी आवश्यक |
| Generic Elective | | : | मराठी (आवश्यक) / विज्ञान, तंत्रज्ञान व प्रगती (पैकी १) |
| | | | Marathi (Compulsory) / S.T.D. (Any 1) |
| Group A | | : | ऐच्छिक मराठी / ऐच्छिक इंग्रजी (पैकी १) |
| | | | Optional Marathi / Optional English (Any 1) |
| Group B | i) | : | इतिहास / अर्थशास्त्र (पैकी १) |
| | i) | : | History/ Economics (Any 1) |
| | ii) | | समाजशास्त्र / मानसशास्त्र / भूगोल (पैकी २) |
| | ii) | : | Sociology/ Psychology/ Geography (Any 2) |

**टीप : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून बी. ए. भाग १ प्रथम सत्रासाठी "लोकशाही, निवडणूका आणि सुशासन" हा विषय व द्वितीय सत्रासाठी "कार्यक्रम व्यवस्थापन" हे आवश्यक विषय म्हणून सुरु करण्यात आलेले आहेत.**

Note : Shivaji University has introduced ' Democracy, Elections & Good Governance' and 'Event Management' as a compulsory subjects at B.A. I from the academic year 2017-18

* प्रत्येक ग्रुप मधून किमान एक विषय निवडणे बंधनकारक.

Choose at least one subject from each group.

* एकदा निवडलेल्या विषयामध्ये बदल करता येणार नाही.
  Once subjects are chosen changes will not be made.
* CBCS पध्दती लागू करणे विद्यापीठावर अवलंबून आहे.
  Application of CBCS pattern is depend upon Shivaji University.

## बी. ए. भाग २

शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून यु.जी.सी. व विद्यापीठाच्या सुचनेनुसार 'चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टीम' (CBCS) बी. ए. भाग २ साठी लागू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी बी. ए. भाग १ साठी निवडलेल्या ४ ऐच्छिक विषयापैकी प्रत्येक गटातून एक असे २ ऐच्छिक विषय निवडावेत. प्रत्येक ऐच्छिक विषयाचे २ पेपर असतील. तसेच आंतरविद्याशाखीय विषयामधून कोणताही १ विषय निवडावा.

From the academic year 2019-20, the university has introduced 'Choice Based Credit Sestem' (CBCS) for B.A.II. Students should select 1 optional subject from each group. Students should choose the optional subject which are selected for B.A.I. Each optional subject has 2 papers. Also student should select 1 subject from Interdisciplinary subjects.

| | | |
|---|---|---|
| Ability Enhancement Core Course (AECC) | : | English Compulsory / इंग्रजी आवश्यक |
| AECC-EVS | : | Environmental Studies / पर्यावरण अभ्यास आवश्यक |
| Discipline Specific Core Course (DSC) | : | मराठी / इंग्रजी / अर्थशास्त्र / इतिहास (पैकी १)<br>Marathi / English / Economics / History (Any 1)<br>समाजशास्त्र / मानसशास्त्र / भूगोल (पैकी १)<br>Sociology/ Psychology/ Geography (Any 1) |
| Inter Disciplinary Studies (IDS) | : | मानवी विकास / सहकार (पैकी १)<br>Human Developement / Co-operation (Any 1) |

**टीप :** मराठी व भूगोल हे ऐच्छिक विषय निवडलेल्या विद्यार्थ्यांना मानवी विकास हा विषय घेणे बंधनकारक राहील.

**Note:** The students who want to select Marathi and Geography as optional subject, should select Human Development subject from IDS group.

## बी. ए. भाग ३

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून यु.जी.सी. व विद्यापीठाच्या सुचनेनुसार 'चॉईस बेस्ड क्रे डीट सिस्टीम' (CBCS) बी. ए. भाग ३ साठी लागू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना बी. ए. भाग ३ साठी खालील स्पेशल विषयामधून (बी. ए. भाग २ साठी निवडलेल्या) एका विषयाची निवड करावी लागेल. या विषयाचे प्रत्येक सत्रासाठी (सेमिस्टर) एकूण ५ पेपर्स असतील.

From the academic year 2020-21, the university has introduced 'Choice Based Credit Sestem' (CBCS) for B.A.III. Students should select 1 optional subject from each group. For B.A.III, students can choose one special subject from the subjects selected for B.A.II. The special subject has 5 papers for each semester.

| आवश्यक विषय | ऐच्छिक विषय |
|---|---|
| १) इंग्रजी (AECC 5 & 6) | १) मराठी (DSE) २) इंग्रजी (DSE)<br>३) अर्थशास्त्र (DSE) ४) इतिहास (DSE)<br>वरील चारपैकी एक विषय निवडावा. त्या विषयाचे पाच पेपर असतील |

| Compulsory Subject | Optional Subject (Special) |
|---|---|
| 1. English<br>(AECC 5 & 6) | 1. Marathi (DSE) 2. English (DSE)<br>3. Economics (DSE) 4. History (DSE)<br>Select any subject from above. The Selected subject has five papers |

**आधारित पाठ्यक्रम घेतला जाईल.**

प्रोजेक्ट, सेमिनारमधून अंतर्गत मूल्यमापन १० गुणांसाठी असेल.

Internal evaluation is based on Project and Seminar for 10 marks.

सेमिस्टर एक व दोन पास असलेल्या विद्यार्थ्यांनाच बी. ए. भाग ३ ला प्रवेश मिळेल.

Students who passed semester I and II, will get admission for B. A. I.

## प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे

१) टी. सी. (मूळ दाखला)

२) बी. ए. भाग १ साठी १० वी व १२ वीच्या गुणपत्रकाच्या साक्षांकित ३ प्रती.

३) बी. ए. भाग २ व ३ साठी पूर्वीच्या वर्गाची पास झाल्याची गुणपत्रके ४ प्रती जोडणे आवश्यक.

४) प्रतिज्ञापत्र.

५) ओळखपत्र आकाराचे ३ फोटो

६) अॅन्टी रॅगिंग हमीपत्र.

७) जातीचे प्रमाणपत्र. (लागू असल्यास)

८) आधार कार्ड झेरॉक्स

९) रेशनकार्डची झेरॉक्स
१०) रहिवासी दाखला (डोमेसाईल)
११) राष्ट्रीयकृत बँक पासबुक झेरॉक्स
१२) तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला.
१३) जे विद्यार्थी ई. बी. सी. सवलत घेऊ इच्छितात त्यांनी ऑनलाईन फॉर्म भरुन योग्य त्या कागदपत्रासह सादर करावेत.
१४) विविध शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज- प्राथमिक (पी. टी. सी.), माध्यमिक (एस. टी. सी.), स्वातंत्र्यसैनिक, आजी व माजी सैनिक, अपंग शिष्यवृत्ती व विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती) SC / ST / NT / OBC विद्यार्थ्यांनी (भारत सरकार शिष्यवृत्तीचे) ऑनलाईन अर्ज भरून त्याची प्रिंट User name व Password सह द्यावी.

## Documents required for Admission

1. Transfer Certificate (original T.C.)
2. Attested xerox copies of marksheet of SSC and HSC for the admission process of B.A. I.
3. It is required to submit 4 xerox copies of previous year passing result for the admission of B.A.I and B.A.II.
4. Affidavit
5. I-card size 3 photo copies.
6. Affidavit for Anti-ragging
7. Caste Certificate (If Applicable)
8. Aadhar card xerox
9. Ration card xerox
10. Domicile Certificate Xerox
11. Nationalized Bank Passbook Xerox
12. Income Certificate by Magistrate Officer
13. The students who wish to seek E.B.C. scholarship, need to apply online with required documents.
14. The students who intended to apply for various scholarships (P.T.C., S.T.C., Freedom fighter, Ex-serviceman, Disability and University merit scholarship, SC/ST/NT/OBC scholarship) are required to fill online form and to submit hard copy of the form in the college with User name and Password.

# प्रवेश फी २०२२-२०२३ Fees Structure 2022-2023

| अ.क्र. | फी तपशील Particulars | बी. ए. भाग १ B.A.-I | बी. ए. भाग २ B.A.-II | बी .ए. भाग ३ B.A.III |
|---|---|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क Admission fee | १० | १० | १० |
| २ | ग्रंथालय शुल्क Library fee | १०० | ५० | ५० |
| ३ | जिमखाना शुल्क Gymkhana fee | १५० | ५० | ५० |
| ४ | युवा महोत्सव Youth Festival | ५५ | २५ | २५ |
| ५ | सांस्कृतीक शुल्क Cultural Fee | १०० | ५० | ५० |
| ६ | विकास निधी Development fund | १५० | १५० | १५० |
| ७ | प्रो-रेटा (विद्यापीठ+झोनल=२५+५) Pro-reta(University Zonal=25+5) | ३० | ३० | ३० |
| ८ | अश्वमेध Ashwamedh | ३० | ३० | ३० |
| ९ | आपत्कालीन निधी Emergency Fund | १० | १० | १० |
| १० | अग्रणी महाविद्यालय निधी Lead college Fund | २५ | २५ | २५ |
| ११ | ई-सेवा E-Service | ५० | ५० | ५० |
| १२ | विद्यार्थी मदत Student Aid (S.A. Fund) | २५ | २५ | २५ |
| १३ | एन.एस.एस. एकक निधी NSS Fund | १० | १० | १० |
| १४ | पात्रता फी Eligibility Fee | ७५ | -- | - |
| १५ | पर्यावरण अभ्यास Environment study | - | २५० | - |
| १६ | विद्यार्थी कल्याण निधी (विमा) Student Welfare Fund (Insu.) | ५० | ५० | ५० |
| १७ | अभ्यासेत्तर विविध उपक्रम Extracurricular Activity | १०० | १०० | १०० |
| १८ | वार्षिक अंक Annual Issue | १२५ | १२५ | १२५ |
| १९ | कॉमन ब्रेकेज Common Breakage | ४० | ४० | ४० |
| २० | बारोकार्ड Borrow Card | ४० | ४० | ४० |
| २१ | आयकार्ड ID Card | ४० | ४० | ४० |
| २२ | अंतर्गत परीक्षा Internal Exam | १५० | ५० | ५० |
| २३ | इंटरनेट सेवा Internet Service | २०० | २०० | २०० |
| २४ | ध्वजनिधी Flag Fund | १० | १० | १० |
| | Total | १५७५ | १४२० | ११७० |
| | For Paying Students | ८०० | ८०० | ८०० |
| | EBC आणि शिष्यवृत्ती न भरलेल्या विद्यार्थ्यांसाठी | | | |

टीप : डी.एड./डी.टी.एड. झालेल्या आणि बाहेरील विद्यापीठातून स्थलांतरित होऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रु. २५०/– पात्रता फी आकारली जाईल. जे विद्यार्थी स्कॉलरशीप, फ्रीशीप किंवा ईबीसी अंतर्गत येणार नाहीत अशा सर्वांना रु. ८००/– शिक्षण शुल्क भरावे लागेल.

**Note :** Eligibility fees for D. Ed and students from other universities will be charged Rs. 250/- only. The students who are not included in scholarship and EBC are required to pay tuition fees Rs. 800/- only.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तसेच महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमानुसार प्रवेश दिला जाईल. हे नियम सूचना फलकावर लावण्यात येतील. विद्यार्थ्यांनी प्रवेशापूर्वी या सूचना वाचाव्यात. प्रवेश नाकारण्याचा अधिकार प्राचार्यांना प्राप्त आहे.

Admission will be given as per the norms laid by Shivaji University and the Government of Maharashtra. These rules are displayed on the notice board. Students should read these instructions before admission. The right of giving and rejecting admission is reserved by the Principal.

**इतर शुल्कांसंबंधी :**

१. प्रवेशाकरिता महाविद्यालय किंवा संस्था कुठल्याही प्रकारची आगाऊ रक्कम तसेच देणगी घेत नाही.

२. प्रवेश शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि महाराष्ट्र शासन नियमांच्या अधिन राहून गुणवत्तेप्रमाणे दिला जाईल.

३. तक्त्यात नमूद केलेल्या शुल्का व्यतिरिक्त इतर विविध उपक्रमांसाठी शुल्क आकारले जाईल.

४. प्रवेशाच्यावेळी तक्त्यात नमूद केलेले तसेच इतर शुल्क एका टप्प्यात भरावे लागेल. सदर शुल्क एका / चालू शैक्षणिक वर्षाकरिता असेल. ज्या विद्यार्थ्यांना असे शुल्क अत्यंत अडचणींमुळे एका टप्प्यात भरता येणार नाही अशा विद्यार्थ्यांनी प्राचार्यांची लेखी अर्जाद्वारे परवानगी घ्यावी.

५. शुल्कासंबंधी विद्यापीठाकडून करण्यात आलेले बदल त्या त्यावेळी काचफलकात लावण्यात येतील.

६. SC/ST/VJNT वर्गातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क आकारले जाणार नाही. तथापि अशा विद्यार्थ्यांनी सूचित केल्याप्रमाणे शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरुन तात्काळ द्यावेत. असे न झाल्यास सदर विद्यार्थ्यांस पूर्ण शिक्षण शुल्क भरावे लागेल.

७. सर्व विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या नियमानुसार आकारले जाईल.

८. एकदा भरलेली फी परत मिळणार नाही.

**Notes related to Fees**

1. The college or the institute does not demand any kind of extra fees or donation for admission.
2. Admission will be given according to the rules laid by Shivaji University & Government of Maharashtra on the basis of quality.
3. Apart from the charges mentioned in the chart, additional fees will be charged for various activities
4. At the time of admission, the fees mentioned in the chart and the other fees should be paid at the time of admission in one installment. This fee will be for an academic year. Students who have difficulties about fees should meet Principal with written application.
5. The change made in fees by the university is displayed into notice board.
6. The education fee will not be charged from the student of SC / ST/ VJNT. However, the scholarship application should be done immediately by category student. If it is not done accordingly then the student will have to pay a full education fee.
7. Exam fees will be charged as per the rules of the University.
8. The fee will not be refunded

## महाविद्यालयाचे अंतरंग

### समृध्द ग्रंथालय व सुसज्ज अभ्यासिका

महाविद्यालयात ग्रंथालयाची स्वतंत्र व्यवस्था असून क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, दैनिके विपुल प्रमाणात आहेत. ग्रंथालयामध्येच स्वतंत्र अभ्यासिकेची सोय करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना गरजेप्रमाणे पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात.

### Opulent Library & Well Equipped Reading Room

The library has a separate system including the text books, magazines, Reference books, Newspapers are in abundance. There is a facility of separate reading room. Books are made available to the students as per their requirement.

## साधारण नियम

१. ग्रंथालयात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याकडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे. ओळखपत्राची मागणी केल्यास ते दाखविणे बंधनकारक असेल.

२. ओळखपत्र व वाचनालयाचे नोंदणी पत्र अहस्तांतरणीय आहे.

३. विद्यार्थ्यांनी पुस्तके, मासिके, संदर्भ ग्रंथ इ. काळजीपूर्वक हाताळावेत. जर पुस्तकांची पाने फाडणे, खराब करणे किंवा पुस्तक व्यवस्थित हाताळले नसल्याचे आढळल्यास दंड आकारला जाईल व योग्य ती कारवाई केली जाईल.

४. फक्त क्रमिक पुस्तके व कादंबऱ्या घरी वाचावयास मिळतील.

५. वाचनालयात तसेच ग्रंथालयात शांतता व शिस्त राखणे बंधनकारक आहे.

६. विद्यार्थ्यांना क्रमिक, संदर्भ पुस्तके आणि नियतकालिके ओळखपत्रावर दिली जातील. सदर पुस्तके परवानगीशिवाय वाचनालयाच्या बाहेर घेऊन जाता येणार नाहीत.

७. आवश्यक संदर्भ ग्रंथासंबंधी विद्यार्थ्यांनी ग्रंथपालाशी संपर्क साधावा.

८. मुळ ओळखपत्र, ग्रंथालय नोंदणी कार्ड हरविल्यास रु. १००/- भरुन त्याची दुबार प्रत (डुप्लिकेट) दिली जाईल.

९. काही कारणास्तव पुस्तके ग्रंथालयात जमा करण्यास उशीर झाल्यास, पहिल्या आठवड्यात २ रु. प्रतिदिन याप्रमाणे दंड भरावा लागेल. त्यानंतर ४ रु. प्रतिदिन प्रमाणे दंड आकारला जाईल.

१०. दंड आकारताना सुट्यांचाही दंड आकारला जाईल.

११. वरील नियमांचा भंग केल्यास त्याची माहिती कार्यवाहीसाठी प्राचार्यांकडे पुरवली जाईल.

## General Rules

1. Every student entering the library must have a college identity card. It is mandatory to produce the identity card as per demand.
2. The identity card and library's borrow card is non-transferable
3. Students should handle books, magazines, reference books etc. carefully. Any attempt to damage books, periodicals, tearing or defacing the pages will be treated as misconduct and fine will be charged.
4. Only text books & Novels student can bring home against the borrow card.
5. A complete silence and strict discipline be maintained in the library and reading room.
6. Text books, reference books and periodicals will be issued against the Id

card. It is not allowed to take the books outside the library without permission.

7. Students should contact the librarian for required reference books.
8. Losing the original identity card and borrow card, the student will be charged 100/-Rs. for duplicate copy.
9. In case of late return of books, students will have to pay a fine of Rs. 2/- per day for the first week and Rs. 4/- per day onwards.
10. Penalty will be charged including holidays too.
11. Any violation of these rules will be reported to the Principal for appropriate action.

**१) पुस्तक पेढी**

गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात पुस्तक पेढी (Book Bank) ची व्यवस्था करण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी सदर योजनेसाठी ग्रंथपालाशी संपर्क साधावा.

## Book Bank

Book Bank Scheme has been introduced in the college for needy and meritorious students. The interested students should contact the librarian.

**क्रीडा विभाग**

महाविद्यालयाचा क्रीडा विभाग विविध क्रीडा साधनांनी समृध्द आहे. जिमखाना विभागातून विभागीय, आंतरविभागीय तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार केले जातात. खो-खो आणि कुस्ती या खेळामध्ये आमचे खेळाडू राज्य व राष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहेत.

## Sports Department

The sports department of the college is equipped with various sports equipment. Players are participated in Zonal, Interzonal and National level competitions. Our players have a great contribution in the sports like Kho-Kho, Kabaddi and Wrestling.

### विद्यार्थी परिषद

विद्यापीठाच्या बदललेल्या कायदेशीर तरतुदीनुसार लोकशाही निवडणूक पद्धतीने विद्यार्थी परिषद महाविद्यालयात स्थापना केली जाईल.

## Student Council

A Student Council will be established in Democratic Election Mode according to the revised University Act 2016.

### राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० विद्यार्थ्यांचे एक युनिट असून या विभागामार्फत एकदिवसीय व विशेष श्रमसंस्कार शिबिरांचे आयोजन करण्यात येते. ज्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा तसेच समाजसेवेत रुची आहे अशांनाच प्रवेश दिला जातो. श्रमसंस्कार शिबिरासाठी ५० विद्यार्थी निवडले जातात. एन. एस. एस. मध्ये दोन वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना बी. ए. ३ मध्ये अतिरिक्त १० गुणांची वाढ करण्यात येते. हे गुण पासिंगसाठी धरले जातात.

## National Service Scheme

National Service Scheme has a unit of 100 students in a college. The unit organizes one day & special camps. Students who are interested in national service as well as social service are admitted. 50 students are selected for NSS camp.Students who actively completed 2 years in NSS will be given extra 10 marks in B.A. III exam. These marks are considered for passing.

### सांस्कृतिक विभाग

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग कार्यरत असून या विभागांतर्गत विविध स्पर्धा, विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये भाग घेतला जातो.

## Cultural Department

The cultural department promotes students to participate in various competitions like Yuva Mahotsava.

### कल्पतरंग भित्तीपत्रक व मोहनीय नियतकालिक

विद्यार्थ्यांच्या साहित्यिक गुणांचा विकास घडवून आणण्यासाठी महाविद्यालयात 'कल्पतरंग' भित्तीपत्रक व 'मोहनीय' नियतकालिक प्रकाशित केले जाते. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांचे लेखन प्रकाशित केले जाते.

## Wall Paper & Annual Magazine

The college publishes 'Kalptarang' wallpaper & 'Mohaniya' magazine to develop the literary qualities of the students. The interested students actively publish their articles, poems and cartoons etc.

### स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेबाबत (M. P. S. C.) मार्गदर्शन करुन त्यांची तयारी करुन घेतली जाते. या केंद्रमार्फत महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षेसंबंधी विविध व्याख्याने आयोजित केली जातात. महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यशस्वीरित्या चालविले जाते. आजी व माजी अशा दोन्ही विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा केंद्राचा लाभ घेता येतो. ग्रंथालयामध्ये स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांची खास सोय आहे.

## Competitive Exam Guidance Centre

Students are guided and prepared for the competitive examinations through this center. Lectures of eminent officials, professors, experts, candidates who qualified MPSC/ UPSC are organized in this center time to time. Both the admitted student and the former students can avail the competitive examination center. Competitive exam books are available in the library.

### स्वयंसिध्द छंद मंडळ

या मंडळामार्फत विद्यार्थ्यांची आवड आणि छंद जोपासण्यासाठी विविध प्रकारचे कमी कालावधीचे (Short Term) कोर्सेस चालविले जातात. यामध्ये रांगोळी, विणकाम, मेहंदी, कुकरी, शिवणक्लास, भरतकाम, जर्दोषी, ज्वेलरी डिझायनिंग, पेंटिंग, फुले तयार करणे, स्पंज बॅग, आईस्क्रिम कांड्या, रिबीन वर्क, कशिदा वर्क, आरी वर्क, ब्युटीपार्लर, एम्ब्रॉयडरी यासारखे व्यावसायिक कोर्स राबविले जातात.

## Hobby Centre

To cultivate the hobbies & interest among the students this center runs short term courses. Rangoli, Mehndi, Cookery, Sewing class, Embroidery, Painting, Beauty parlour these courses are run through this center.

**स्पोकन इंग्लिश कोर्स**

आधुनिक युगात इंग्रजी भाषेचे वाढत गेलेले महत्त्व लक्षात घेऊन महाविद्यालयात स्पोकन इंग्लिश कोर्सची सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये लेखी व संभाषण कौशल्य, समूह चर्चा, भरपूर सराव घेतला जातो.

## Spoken English Course

Spoken English Course has been started in the college considering the importance of English language in the modern era. A lot of practice is taken for written and spoken skills, group discussion etc.

**रिमेडियल कोर्स ॲन्ड ब्रिज कोर्स**

महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्यावतीने अप्रगत विद्यार्थ्यांसाठी रिमेडियल कोर्स ॲन्ड ब्रिज कोर्स चे आयोजन केले जाते. सदर कोर्ससाठी विद्यार्थ्यांची निवड वर्षाच्या सुरुवातीला कॉमन टेस्ट घेऊन केली जाते.

## Remedial Course & Bridge course

Department of English organizes remedial course for slow learners. For this course students are selected through the Common test at the beginning of the year.

**शारीरिक शिक्षण परीक्षा**

बी. ए. भाग १ च्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाची १० गुणांची परीक्षा अनिवार्य आहे. जर एखादा विद्यार्थी विद्यापीठ परीक्षेत एक किंवा दोन विषयात नापास झालेला असेल त्याला याचा लाभ पुढील वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी दिला जातो.

## Physical Education Exam

There will be compulsory Physical Education Exam of 10 marks for B.A. I. If a student fails in one or two subjects of university exam, he/ she will get these 10 marks to promote in the higher class.

**अंतर्गत परीक्षा मूल्यमापन योजना (Internal Exam & Evaluation Scheme)**

१) बी. ए. ३ च्या सर्व विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मूल्यमापनासाठी प्रत्येक विषयास १० गुणांसाठी गट प्रकल्प (Group Project) आणि चर्चासत्र (Seminar) आयोजित केली जातील.

२) ए. टी. के. टी. आणि ग्रेस गुण हे विद्यापीठाच्या मुख्य वार्षिक परीक्षेसाठी लागू असतील.

३) ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती अत्यल्प म्हणजे पारित केलेल्या पत्रकानुसार * (Govt. Ordinance 11 a, 125 etc.) नसेल तसेच ज्या विद्यार्थ्यांची वागणूक व वर्षभरातील एकूण सादरीकरण खराब/अत्यल्प असेल अशा विद्यार्थ्यांचे विद्यापीठ परीक्षा अर्ज भरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

## Internal Exam. & Evaluation

1. Group Project and Seminars of 10 marks are organized for internal assessment of B.A. III students .
2. ATKT and Grace Marks will be applicable as prescribed by the University.
3. Students should note that examination forms of the following students will not be sent or if already sent will be withdrawn if there is (a) poor attendance (as per Govt. Ordinance 11 a, 125 etc.) and (b) poor conduct and performance.

### परीक्षा विभाग

विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने महाविद्यालयांतर्गत शैक्षणिक वर्षात एकूण २ चाचणी परीक्षा, २ पूर्व परीक्षा (प्रत्येकी २५ गुण) व ४ गृहपाठांचे (Home Assignment) आयोजन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत होते.

## Exam Section

The college conducts 2 unit tests (25 marks), 2 prelims (40 marks) and 4 Home assignments to increase quality of the student.

### विविध शिष्यवृत्त्या व पारितोषिके (Scholarships & Prizes)

### आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी सवलत (E.B.C.)

ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे मागील वर्षाचे उत्पन्न रु. १,००,०००/- च्या आत आहे. अशा विद्यार्थ्यांना ही फी सवलत मिळते. (विद्यार्थी शहरी भागातील असल्यास ऑनररी मॅजिस्ट्रेट / एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेटच्या सहीचे उत्पन्नाचे दाखले आणावेत. विद्यार्थी ग्रामीण भागातील असल्यास तहसिलदार यांचा सही शिक्का असलेला उत्पन्नाचा दाखला आणावा. सदर दाखला नसल्यास फी सवलत मिळत नाही.) ही सवलत फक्त महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना मंजूर होते. यासाठी विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती ८०% असावी लागते. अन्यथा ही फी सवलत रद्द होते. या प्रकारामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले अर्ज

ऑनलाईन भरुन योग्य त्या कागदपत्रासह कार्यालयात वेळेत सादर करावेत.

